शुक्रवार दि. २९ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २६७ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली लाचेचा खेळ

### जालन्यात एसीबीची मोठी कारवाई; दोन अधिकाऱ्यांना रंगेहाथ पकडले

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेतील अतिक्रमण निर्मूलन विभागातील दोन अधिकाऱ्यांना ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या (एसीबी) पथकाने रंगेहात पकडल्याची धक्कादायक घटना गुरुवारी उघडकीस आली. या कारवाईमुळे जालना महानगरपालिकेत एकच खळबळ उडाली असून शहरात या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे.

लाचलुचपत प्रतिबंध विभाग, छत्रपती संभाजीनगर येथील पथकाने ही सापळा कारवाई यशस्वीरित्या पार पाडली. या प्रकरणात भाऊलाल चापा राठोड (वय ५७) व श्यामसन छबुराव कसबे (वय ५१) या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. राठोड हे प्रभारी सहायक अतिक्रमण पथक प्रमुख म्हणून कार्यरत असून कसबे हे प्रभारी सहायक अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख पदावर कार्यरत आहेत.

**सामाजिक कार्यकर्त्याकडून तक्रार**

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे सामाजिक कार्यकर्ते असून त्यांनी जालना शहरातील मामा चौक ते कोलू तेली घाणा संघ परिसरातील नाल्यावर झालेली अतिक्रमणे हटविणे व नालेसफाई करण्याबाबत महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदन दिले होते. त्यानंतर महानगरपालिकेच्या उपायुक्तांनी संबंधित अतिक्रमण विभागाला स्थळ पाहणी करून नियमानुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. आदेशानुसार आरोपी अधिकाऱ्यांनी पथकासह पाहणी केली होती. मात्र, त्यानंतरही अतिक्रमण हटविण्याची कारवाई होत नसल्याने तक्रारदारांनी वारंवार पाठपुरावा केला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी ''कामासाठी खर्च येईल'' असे सांगत ४० हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे.

**एसीबीकडे धाव**

तक्रारदारांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी थेट लाचलुचपत प्रतिबंध विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार दाखल केली. त्यानंतर एसीबीने २० मार्च २०२६ रोजी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी केली. पडताळणीदरम्यान आरोपी राठोड व कसबे यांनी ४० हजार रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

**बाबा टी हाऊस येथे सापळा**

यानंतर एसीबीने नियोजनबद्ध सापळा रचला. गुरुवारी २८ मे २०२६ रोजी जुना मोंढा परिसरातील दवा मार्केट गेट येथील बाबा टी हाऊस येथे तक्रारदारांकडून ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना आरोपी श्यामसन कसबे याला रंगेहात पकडण्यात आले. त्यानंतर आरोपी भाऊलाल राठोड यालाही ताब्यात घेण्यात आले.

कारवाईदरम्यान आरोपींकडून लाचेची ४० हजार रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली. तसेच आरोपींच्या ताब्यातून सॅमसंग व ओप्पो कंपनीचे मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून त्यांचे तांत्रिक विश्लेषण सुरू असल्याची माहिती एसीबीने दिली.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली**

(पान २ वर)

## प्रा.अरुण पडघन यांना मराठी विषयात पी.एचडी पदवी

**जालना । प्रतिनिधी**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड परिक्षेत्रातील भाषा ,साहित्य आणि संस्कृती अभ्यास संकुल स्वा.रा.ती.म.विद्यापीठ ,नांदेड संशोधन केंद्र येथे कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय ,परभणी मराठी विभाग,प्रमुख प्रा.अरुण बळीराम पडघन यांनी सन १९९१ ते २००० च्या दशकातील मराठी आत्मकथनांचा चिकित्सक अभ्यास या विषयावर प्रो.प्राचार्य डॉ.शत्रुघ्न जाधव यांचे मार्गदर्शना खाली आपला पी.एचडी चा शोध प्रबंध सादर केला. दि.२२ मे २०२६ रोजी पी.एचडी साठी मौखिक चाचणी घेण्यात आली.प्रसंगी डॉ.पृथ्वीराज तौर (संचालक, भाषा साहित्य आणि संस्कृती अभ्यास संकुल स्वा.रा.ती.म.वि,नांदेड ) यांचे अध्यक्षते खाली डॉ.सदाशीव सरकटे (प्राचार्य कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा ) हे रेफरी तर प्रो.प्राचार्य.डॉ.शत्रुघ्न जाधव मार्गदर्शक ,तसेच इंजि.विष्णुजी सोनूने आदी मान्यवरांसह विद्यार्थी यांची उपस्थिती लाभली.

या वेळी प्रो.डॉ.डी.एन.मोरे, प्राचार्य डॉ.सुर्यकांत जोगदंड, इंजि. नारायणराव चौधरी ( सदस्य , व्यवस्थापन परिषद स्वारातीम विद्यापीठ,नांदेड.) कुलसचिव डॉ.ज्ञानेश्वर पवार ,मानव्य विद्या शाखेचे प्र-अधिष्ठाता डॉ.पराग खडके, प्र- अधिष्ठाता डॉ.माधवराव पाटील,प्राचार्य डॉ.मा.मा.जाधव (अध्यक्ष,मराठी भाषा अभ्यास मंडळ ,स्वारातीम विद्यापीठ,नांदेड. ) प्राचार्य डॉ रामचंद्र भिसे यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले.

पी.एचडी पदवी संपादन केल्याबद्दल हेमंतराव जामकर (अध्यक्ष, नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था,परभणी.) (पान २ वर)

## पत्नीचा रुमालाने गळा आवळून सदोष मनुष्यवध

### आरोपी पतीला १० वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा

**जालना । प्रतिनिधी**

पत्नीचा रुमालाने गळा आवळून सदोष मनुष्यवध केल्याप्रकरणी जालना जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी पतीला १० वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा मोहिते यांनी गुरुवारी (दि. २८ मे) हा महत्वपूर्ण निकाल दिला. तसेच आरोपीस १० हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला असून दंड न भरल्यास आणखी दोन वर्षे सश्रम कारावास भोगावा लागणार आहे.



या प्रकरणातील आरोपी गजानन हरिभाऊ कावळे (रा. भाटेपुरी, ता. जि. जालना) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५ (-) अंतर्गत दोष सिद्ध झाल्यानंतर न्यायालयाने ही शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. डॉ. दिपक नारायणराव कोल्हे यांनी प्रभावी युक्तिवाद केला.

**दारूच्या नशेत पत्नीशी वाद**

प्रकरणातील माहितीनुसार, २८ जानेवारी २०२५ रोजी आरोपी गजानन कावळे हा दारू पिऊन घरी आला होता. त्यानंतर त्याचा पत्नी वंदना कावळे हिच्यासोबत वाद झाला. हा वाद इतका टोकाला गेला की आरोपीने संतापाच्या भरात पत्नीचा रुमालाने गळा आवळून तिचा सदोष मनुष्यवध केला.

या घटनेनंतर फिर्यादी रामनाथ उत्तमराव घाटोळे यांनी मौजपुरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून आरोपीविरुद्ध गुन्हा क्रमांक ०९/२०२५ अंतर्गत भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) व २३८(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

**तपासानंतर दोषारोपपत्र दाखल**

पोलीसांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. (पान २ वर)

जालन्यात आयपीएल सट्ट्यावर पोलिसांची धडक कारवाई

## सदर बाजार पोलिसांनी रुपाली बार परिसरात टाकला छापा; दोन आरोपी ताब्यात, २३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत आयपीएल क्रिकेट सामन्यांवर ऑनलाईन सट्टा खेळणाऱ्या दोन इसमांवर पोलिसांनी धडक कारवाई करत त्यांच्याकडून मोबाईलसह २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई मंगळवारी (दि. २६ मे २०२६) रात्री उशिरा छापा टाकून करण्यात आली. पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधु आणि अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी जिल्ह्यात सुरू असलेल्या जुगार व सट्टा व्यवसायाविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली.

**रुपाली बार परिसरात सुरू होता ऑनलाईन सट्टा**

मिळालेल्या माहितीनुसार, जालना शहरातील छाईपुरा भागातील रुपाली बार परिसरात काही इसम मोबाईलच्या माध्यमातून गुगल क्रोमवर आयपीएल सामन्यांवर ऑनलाईन सट्टा खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून रात्री सुमारे ११ वाजेच्या सुमारास छापा टाकला.

छाप्यामध्ये आरोपी मोबाईलवर सट्टा खेळताना आढळून आले. पोलिसांनी तत्काळ त्यांना ताब्यात घेत त्यांच्या ताब्यातील मोबाईल फोन जप्त केले.

**२३ हजारांचा मुद्देमाल जप्त**

कारवाईदरम्यान पोलिसांनी एकूण २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यात ८ हजार रुपये किमतीचा निळसर रंगाचा जुना मोबाईल तसेच १५ हजार रुपये किमतीचा सिल्वर रंगाचा सॅमसंग गॅलेक्सी एफ-१५ मोबाईलचा समावेश आहे.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

**आरोपी कोण?**

या कारवाईत पोलिसांनी खालील आरोपींना ताब्यात घेतले आहे :

अश्विन राजकुमार कटारिया (वय ४०, रा. मराठा बिल्डिंग, जालना) जगदीश रामेश्वरदास अग्रवाल (वय ६०, रा. जयशंकरनगर, जालना)

या दोघांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४६५/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार (पान २ वर)

## वीजपुरवठा सुरू होण्याआधीच विद्युतखांब कोसळले

**दत्ता देशमुख**

वीजपुरवठा सुरू होण्याआधीच विद्युत खांब कोसळल्याची घटना जाफराबाद तालुक्यातील कुंभारझरी फाटा ते डोलखेडा रस्त्यावर घडली . याबाबत माहिती अशी की गेल्या महिनाभरापूर्वी वीज वितरण कंपनी चे विद्युत खांब रोवण्याचे व तार ओढण्याचे काम गुत्तेदारामार्फत करण्यात आले. गुत्तेदाराने विद्युत खांब चक्क रस्त्यावरच रोवले आहे .त्यामुळे हे खांब रस्त्याच्या मोकळ्या मातीत रोवल्याने कोसळत आहेत .तसेच विद्युत खांब सरळ रेषेत रोवले नसून खांबांना योग्य



ठिकाणी तान लावण्यात आलेले नाही. त्यामुळे विद्युत वितरण कंपनीच्या निष्काळजीपणाचा कळस झाल्याचे प्रवाशा मधून बोलले जात आहे .परिसरात गेल्या दोन दिवसा अगोदर वादळी वाऱ्यासह पाऊस झाला या वादळी पावसात हे खांब पडल्याचे योगेश बंगाळे यांनी सांगितले. सदरील कोसळलेले विद्युत खांब तात्काळ उभे करावेत अशी मागणी परिसरातील नागरिक व प्रवाशांनी केली आहे .

## स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई ; ०६ घरफोडीचे गुन्हे उघड, तीन आरोपी जेरबंद

### जालन्यातील घरफोडी मालिकेचा पर्दाफाश ; रोख रक्कम, मोबाईलसह १ लाख १९ हजारांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या घरफोडी आणि चोरीच्या घटनांचा अखेर स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी धडक कारवाई करत सहा घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले असून घरफोडी करणारे दोन आरोपी आणि चोरीचा माल खरेदी करणारा एक आरोपी अशा तिघांना जेरबंद करण्यात आले आहे.



आरोपींकडून रोख रक्कम, मोबाईल आणि इतर साहित्य असा एकूण १ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेने केली. जिल्ह्यातील चोरी व घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी विशेष मोहीम राबवून आरोपींचा शोध सुरू केला होता.

**गुप्त माहितीवरून आरोपींचा शोध**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथक घरफोडी करणाऱ्या (पान २ वर)

## जालन्यात अवैध कत्तलखाना उद्ध्वस्त

### चंदनझीरा पोलिसांची धडक कारवाई, साडेअकरा लाखांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर जालना शहर पोलिसांनी मोठी आणि धडाकेबाज कारवाई करत नॅशनल नगर परिसरातील अवैध गोवंश कत्तलखान्यावर छापा टाकला. या कारवाईत तब्बल ११ गोवंशांची कत्तल करण्यात आल्याचे उघडकीस आले असून, सुमारे ७ लाख रुपयांचे गोवंश मांस जप्त करण्यात आले आहे. तसेच घटनास्थळावरून १३ जिवंत गोवंशांची सुटका करण्यात



आली असून त्यांची अंदाजे किंमत ४ लाख ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या कारवाईमुळे संपूर्ण जालना शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली चंदनझीरा पोलिसांनी गुरुवारी दुपारी केली. अवैध कत्तलखान्यावर करण्यात आलेल्या या कारवाईमुळे शहरातील अवैध धंदे चालवणाऱ्यांमध्ये मोठी भीती निर्माण झाली आहे.

**गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांचा छापा**

मिळालेल्या माहितीनुसार, जालना शहरातील नॅशनल नगर परिसरात अवैधरित्या गोवंशांची कत्तल सुरू असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. (पान २ वर)

## मनपा शाळांतील भौतिक सोईसुविधांचा आढावा; १५ जूनपूर्वी कामे पूर्ण करण्याच्या सूचना

### महानगरपालिका शिक्षण विभागाची बैठक संपन्न, विद्यार्थ्यांना सुरक्षित व गुणवत्तापूर्ण वातावरणावर भर

**जालना । प्रतिनिधी**

महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने मनपा शाळांमधील आवश्यक भौतिक सोईसुविधा, दुरुस्तीची कामे आणि विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली. मा. आयुक्त महोदया यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक दिनांक २७ मे २०२६ रोजी सायंकाळी ३ ते ४ वाजेदरम्यान पार पडली.

या बैठकीस महानगरपालिकेच्या १६ शाळांपैकी १५ शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते. आगामी शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**शाळानिहाय समस्यांचा घेतला आढावा**

बैठकीदरम्यान प्रत्येक शाळेतील इमारतींची स्थिती, वर्गखोल्यांच्या दुरुस्त्या, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहांची स्वच्छता व दुरुस्ती, वीज व्यवस्था, फर्निचर उपलब्धता, सुरक्षा उपाययोजना तसेच इतर मूलभूत सुविधांचा शाळानिहाय सखोल आढावा घेण्यात आला.

विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि गुणवत्तापूर्ण वातावरणात शिक्षण मिळावे यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींवर (पान २ वर)

# संपादकीय...

## आयपीएल संपत आला... आणि आता पोलिसांची सट्ट्यावर कारवाई!

**उशिरा जाग आलेल्या यंत्रणांवर प्रश्नचिन्ह; सट्टा मुळापासून संपवायचा असेल तर सातत्यपूर्ण मोहिमेची गरज**

आयपीएल म्हणजे क्रिकेटचा उत्सव. पण गेल्या काही वर्षांत या उत्सवाला ऑनलाइन सट्ट्याचे ग्रहण लागले आहे. मोबाईल आणि इंटरनेटच्या माध्यमातून गावोगावी, शहराशहरात सहज उपलब्ध झालेल्या बेटिंग ॲप्स आणि ऑनलाइन सट्ट्याच्या जाळ्याने तरुणाईला वेढले आहे. जालन्यात सदर बाजार पोलिसांनी नुकतीच केलेली कारवाई ही कायद्याच्या दृष्टीने निश्चितच महत्त्वाची आणि स्वागतार्ह आहे; मात्र या कारवाईची वेळ पाहता अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

कारण आयपीएलचा संपूर्ण हंगाम जवळपास संपत आला असून आता केवळ अंतिम टप्प्यातील दोन सामने बाकी असताना पोलिसांनी कारवाई केली आहे. मग प्रश्न असा निर्माण होतो की, संपूर्ण सीझनभर सुरू असलेल्या सट्टा व्यवहारांकडे यंत्रणांचे दुर्लक्ष झाले होते का? की माहिती असूनही ठोस कारवाई करण्यात विलंब झाला?

आज ऑनलाइन सट्टा हा केवळ काही लोकांचा ''छंद'' राहिलेला नाही, तर तो एक मोठा आर्थिक आणि सामाजिक गुन्हा बनत चालला आहे. अनेक तरुण जलद पैशाच्या मोहात अडकत आहेत. काही जण कर्जबाजारी होत आहेत, तर काहींचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. विशेष म्हणजे आता सट्टा खेळण्यासाठी कुठल्याही मोठ्या अड्ड्याची गरज उरलेली नाही. मोबाईल, इंटरनेट आणि काही ॲप्सच्या माध्यमातून घरबसल्या लाखो रुपयांची उलाढाल होत आहे.

जालन्यातील कारवाईत केवळ दोन मोबाईल आणि २३ हजारांचा मुद्देमाल जप्त झाल्याचे समोर आले. पण प्रत्यक्षात ऑनलाइन सट्ट्याचे व्यवहार यापेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणात होत असल्याची चर्चा सर्वसामान्यांमध्ये आहे. स्थानिक स्तरावर काही जण एजंट म्हणून काम करतात, तर मुख्य नेटवर्क शहराबाहेर किंवा राज्याबाहेर कार्यरत असते. त्यामुळे अशा कारवाया फक्त ''दर्शनी'' राहू नयेत, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

पोलिसांनी जर खरोखरच ऑनलाइन सट्टा रोखायचा असेल, तर केवळ हंगामाच्या शेवटी छापे टाकून उपयोग होणार नाही. त्यासाठी सातत्याने सायबर मॉनिटरिंग, आर्थिक व्यवहारांची चौकशी, संशयित ॲप्सवर लक्ष आणि स्थानिक नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी मोठी मोहीम राबवावी लागेल. विशेषतः तरुणांमध्ये जनजागृती करणेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

यामध्ये आणखी एक गंभीर बाब म्हणजे अनेकदा छोट्या खेळाडूंवर कारवाई होते; मात्र या सट्टा रॅकेटमागील मोठे मास्टरमाइंड आणि आर्थिक साखळी मात्र हाताबाहेरच राहते. त्यामुळे ''मूळापर्यंत पोहोचणारी कारवाई'' हीच काळाची गरज आहे.

जालना पोलिसांनी केलेली कारवाई निश्चितच कायद्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने योग्य आहे. मात्र नागरिकांना आता केवळ छाप्यांच्या बातम्या नकोत, तर ऑनलाइन सट्टा खरोखर कमी झाल्याचे प्रत्यक्ष चित्र पाहायचे आहे. आयपीएल संपत असताना झालेली ही कारवाई पोलिसांच्या सक्रियतेची सुरुवात ठरेल की केवळ औपचारिकता, हे येणारा काळच ठरवेल.

# स्वातंत्र्यवीर सावरकर महान देशभक्त

सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ साली नाशिक जिल्ह्यातील भागुर येथे झाला. सावरकरांच्या मनात जन्मापासूनच देशभक्तीची भावना ज्वालामुखी सारखी धकधकत होती आणि जसे-जसे सावरकर मोठे होत गेले तसतशी स्वातंत्र्यासाठी मशाल प्रज्वलित होत होती.विर सावरकरांनी लाला लजपतराय,बाळ गंगाधर टिळक व विपिन चंद्र पाल या महान क्रांतिकारक महापुरुषांपासुन प्रेरणा घेऊन आपली वाटचाल सुरू केली आणि क्रांतीचा लढा सुरू ठेवला व कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता भारताला स्वतंत्र मिळावे यासाठी स्वतंत्र लढ्याच्या कुंडात उडी घेतली.१८५७ च्या गनिमी संघर्षाच्या विद्रोहाचा संपूर्ण अभ्यास केला.त्यावर आधारित एक पुस्तक लिहिले'' द हिस्ट्री ऑफ व वॉर ऑफ इंडियन इंडिपेंडन्स'' नावाच्या या पूस्तकाने इंग्रज प्रशासनाचे धाबे दणाणले. त्यामुळे हे पुस्तक इंग्रजांनी बेकायदेशीर ठरविले.परंतु सावरकरांच्या गनिमी काव्याने बिहारमध्ये हे पुस्तक लोकप्रिय झाले आणि स्वातंत्र्याची ज्वाला धकधकायला लागली. सावरकर आणि त्याचा भाऊ गणेश यांनी भारतीय परिषद कायदा १९०९ च्या विरोधात निदर्शने केली.यावर इंग्रजांनी त्यांना गुन्हेगार ठरविले व अटक वॉरंट जारी केला अटक होवू नये म्हणून सावरकर पॅरिसला गेले.नंतर १९१० मध्ये सावरकरांना इंग्रजांनी पकडले व न्यायालयाने त्यांना दोषी ठरवुन ५० वर्षाची शक्षिा ठोठावली. ४ जुलै १९११ ला काळ्या पाण्याची शक्षिा जाहीर झाली व अंदमान आणि निकोबार येथील सेल्युलर जेलमध्ये टाकण्यात आले.तेथे त्यांच्यावर इंग्रजांकडुन सतत अत्याचार होत होते. परंतु त्यांनी स्वातंत्र्य लढ्याचा धीर सोडला नाही आणि अनेक यातना सहन करीत इंग्रजांना बजाऊन सांगितले की मी जिवंत आहे तोपर्यंत देश स्वतंत्र झालेला आपल्याला दिसेल व आपल्याला भारत सोडून जावे लागेल आणि हे सावरकरांनी सिद्ध करून दाखविले ही महानता सावरकरांमध्ये दिसून येते.सध्याच्या परिस्थितीत देशातील काही राजकीय पुढारी महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह, विद्वेषक व चिथावणी देणारे विधान करतांना दिसतात.ही बाब अत्यंत घृणास्पद व निंदनीय आहे. देशाच्या इतिहासात सावरकरांना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर असे संबोधले जाते.म्हणजेच स्वातंत्र्यवीर ही पदवी पारतंत्र्यातील देशभक्तांनीच दिली ही बाब आक्षेपार्हय विधान करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. स्वातंत्रपुर्वकाळ अत्यंत खडतर आणि कठीण होता हे सर्वांनाच ठाऊक आहे. त्याकाळी स्वातंत्रवीर सावरकरांच संपूर्ण कुटुंब स्वतंत्र लढ्यात सहभागी होते.महाराष्ट्रात अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष, साधु-संत, समाजसुधारक होवून गेले त्यामुळे महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्रत्येक तळागाळातील व्यक्तींनी आपले वेगवेगळ्या पध्दतीने योगदान दिले आहे.तेव्हाच भारत स्वतंत्र झाला.इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले.परंतु देशाला स्वातंत्र्य करण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या जिवाची पर्वा न करता हसत-हसत फासावर सुध्दा चढले ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.सावरकरांचा काळ कसा होता किंवा त्यांनी स्वातंत्र्य लढा कसा उभारला ही बाब त्याकाळातील सहकाऱ्यांना व देशभक्तांनाच ग्यात असावी.परंतु आता सावरकरांच्या कर्तृत्ववावर कोणी राजकीय पुढारी चीखलफेक करीत असेल व आक्षेपार्ह विधान करीत असेल हे योग्य नाही असे मला वाटते.स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना झालेली काळ्यापाण्याची सजा आणि त्यांनी भोगलेल्या यातना यांचा इतिहास संपूर्ण शालेय पुस्तकांमध्ये लिखित आहे आणि हि शालेय पुस्तके आजची नसुन ७९ वर्षे जुनी आहे.या संपूर्ण पुस्तकांमध्ये अनेक विचारवंतांनी, थोरपुरूशांनी सावरकरांच्या कामाची प्रशंसा सुध्दा केली आहे. तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व स्वातंत्रवीर सावरकर नावाने संबोधले जावु लागले. राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की स्वातंत्र्यवीर ही पदवी कोणालाही सहज मिळत नाही त्यासाठी त्याग करावा लागतो आणि सावरकरांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व भारत स्वतंत्र झाला ही बाब त्यांच्यावर टीका करणाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्याकाळी अनेक उतार चढाव होते यात दुमत नाही.परंतु परिस्थिती नुसार प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या पध्दतीने निर्णय घ्यायचे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक सुद्धा होते.यात जहालवादी, मवाळवादी, क्रांतिकारक अशा अनेक विचारधारांचे लोक होते. त्यामुळे आपसात मतभेद अवश्य असायचे परंतु मतभिन्नता नव्हती.त्यामुळे सर्वांचा एकच उद्देश होता तो म्हणजे भारताला इंग्रजांच्या तावडीतून मुक्त करून स्वतंत्र करने त्यापध्दतीने सर्वांनी आपआपले योगदान दिले व भारत १९४७ ला स्वातंत्र्य झाला.यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मोठे योगदान होते. सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ मध्ये झाला व त्याचा मृत्यू २६फेब्रुवारी १९६६ ला झाला.आज त्यांचा मृत्यू होऊन ६० वर्षे झालीत आणि भारत स्वतंत्र होऊन ७९ वर्षे झालीत मग आताच राजकीय पुढाऱ्यांना कसे काय आठवले की सावरकरांनी इंग्रजांना मदत केली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा इतिहास महाराष्ट्रातील जनतेला, राजकीय पुढाऱ्यांना, पक्ष-विपक्षांना चांगल्या प्रकारे ग्यात आहे. त्यामुळे बाहेरच्या राजकीय पुढाऱ्यांनी महाराष्ट्रातील जनतेला स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल जास्त ग्यान देवु नये. कारण स्व.इंदिरा गांधीसह अनेकांनी सावरकरांचा उल्लेख स्वातंत्र्यवीर सावरकर असा अनेकदा केला आहे ही बाब सावरकरांचा विरोध करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.थोरमहात्मे, क्रांतिकारक,स्वातंतासेनानी किंवा आपले पुर्वज ज्यांच्या कर्तृत्ववामुळे आपण खुला स्वास घेत आहे अशांबद्दल अपशब्द किंवा आक्षेपार्ह विधान निघणार नाही याची काळजी सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी घ्यावी. सरकारला मी आग्रह करेल की स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या बद्दल किंवा आपल्या पुर्वजांबद्दल यानंतर कोणीही आक्षेपार्ह विधान केले तर त्यावर कठोर कारवाई करावी.सध्या देशात विद्वेषी वक्तव्य देण्याचे प्रकार वाढले आहेत.यामुळे सुप्रीम कोर्टाने दिनांक २८ एप्रिल २०२३ ला सुप्रीम कोर्टाने आदेश काढला की विद्वेषी वक्तव्ये करणारे यांची कोणी तक्रार करेल याची वाट न पाहता राज्यांनी कारवाई करावी.त्या कृतीस विलंब झाला तर तो कोर्टाचा अवमान समजला जाईल असे सुप्रीम कोर्टाने आपल्या आदेशात बजावले आहे.त्यामुळे विद्वेषी वक्तव्ये करणाऱ्यांनी आपल्या जिभेवर आवर घालावा. जोपर्यंत सुर्य -चंद्र-तारे-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत सावरकरांचे व संपूर्ण देशभक्तांचे नाव देशात स्वाभिमानाने घेतले जाईल.आज जगातील युद्धजन्य परिस्थिती,बदलते हवामान व वाढते प्रदुषण यामुळे निसर्गाचे संतुलन डगमगायला लागले आहे.यावर मात आपण करू शकतो.याकरिता स्वतंत्रविर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त देशभरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.यामुळे सर्वांनाच शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मदत होईल आणि गुरांना चारा मिळेल. आपण एकाच दिवशी वृक्ष लागवड केली तर लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला स्वतंत्रविर सावरकर यांचे दर्शन होईल. स्वातंत्रवीर सावरकरांना जयंती निमित्त माझा कोटी कोटी प्रणाम!जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## पुनर्विकासाच्या नावाखाली ‘सावरकर सदन’ जमीनदोस्त होऊ देणार नाही!

### हिंदु जनजागृती समितीची आंदोलनाद्वारे मागणी!

**रत्नागिरी - प्रतिनिधी**

स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीकारकांचे महामेरू स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या दादर, मुंबई (शिवाजी पार्क) येथील ऐतिहासिक ‘सावरकर सदन’ या वास्तूवर पुनर्विकासाच्या नावाखाली बिल्डर लॉबीकडून जमीनदोस्त होण्याचे संकट आले आहे. ही ऐतिहासिक वास्तू जमीनदोस्त होण्यापासून वाचवण्यासाठी व तिचे ‘राष्ट्रीय स्मारक’ म्हणून जतन करण्यासाठी आज हिंदु जनजागृती समिती व समविचारी संघटना यांच्या वतीने येथील जयस्तंभ येथे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात श्री. राजेश आयरे (अध्यक्ष, शिक्षक परिषद रत्नागिरी), श्री. नीलेश आखाडे (रत्नागिरी शहर सरचिटणीस, भाजप), श्री. संदीप नाचणकर (जिल्हा उपाध्यक्ष, भाजप, दक्षिण रत्नागिरी), श्री. संजय जोशी (महाराष्ट्र संघटक, महाराष्ट्र मंदिर महासंघ), श्री अनंत आगाशे (अध्यक्ष, कुवारबाव पंचक्रोशी ब्राह्मण सभा), श्री. शैलेश बेर्डे (रत्नागिरी शहर उपाध्यक्ष, भाजप), श्री. गणेश गायकवाड (जिल्हाध्यक्ष, श्रीशिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, रत्नागिरी), अधिवक्ता श्री सचिन रेमणे (विश्व हिंदु परिषद, धर्मप्रसार विभागप्रमुख), श्री. समीर करमरकर (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ), सौ. शुभांगी मुळ्ये (सनातन संस्था) यांच्यासह अनेक सावरकरप्रेमी संघटना आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या वेळी नागरिकांनी सावरकरांच्या जयघोषाने परिसर दणाणून सोडला आणि ‘सावरकर सदन वाचवा’ अशा घोषणा दिल्या. आंदोलनादरम्यान हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक श्री. गोविंद भारद्वाज म्हणाले की, जिन्ना हाऊसला संरक्षण, मग सावरकर सदनावर पडझड का? भारताच्या फाळणीला आणि लाखो हिंदूंच्या कत्तलीला कारणीभूत असणाऱ्या महंमद अली जिन्ना यांचे मुंबईतील ‘जिन्ना हाऊस’ स्वतंत्र भारतात सुरक्षित राहते; मात्र अखंड भारतासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या निवासस्थानाला पुनर्विकासाच्या नावाखाली पाडण्याची वेळ येते, हे दुर्दैवी आहे. केंद्र सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडनमधील घर कोट्यवधी रुपये खर्चून ताब्यात घेतले, तसेच इंदू मिलच्या जागेवर भव्य स्मारक उभारले जात आहे. त्याच धर्तीवर स्वा. सावरकर तब्बल ४ दशके (वर्ष १९३८ ते १९६६) राहिले त्या सावरकर सदनाचेही शासनाने त्वरित संपादन करावे.बृहन्मुंबई महानगरपालिकेने वर्ष २०१० मध्येच या वास्तूचा वारसा () यादीत समावेश करण्याची शिफारस महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडे पाठवली आहे; मात्र गेल्या १५ वर्षांत शासनाने यावर अंतिम निर्णय घेतलेला नाही. याच फायदा घेऊन बिल्डर लॉबी ही वास्तू बळकावण्याचा प्रयत्न करत आहे. आंदोलकांद्वारे शासनाकडे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्यामध्ये सरकारने सावरकर सदन पुनर्विकासाच्या कचाट्यातून वाचवण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करावा आणि या वास्तूचे ‘राष्ट्रीय स्मारकात’ रूपांतर करावे. या वास्तूची मालकी सरकारने स्वतःकडे घेऊन तिथे सावरकरांच्या हस्तलिखितांचे, पत्रांचे भव्य संग्रहालय, संशोधन केंद्र आणि डिजिटल लायब्ररी विकसित करावी.

पान १ वरुन...

### अतिक्रमण हटविण्याच्या...

**कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक माधुरी केदार-कांगणे, अपर पोलीस अधीक्षक शशिकांत सिंगारे व पोलीस उपअधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

सापळा अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक वाल्मिक कोरे यांनी काम पाहिले तर तपास अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक संतोष तिगोटे हे पुढील तपास करीत आहेत. या कारवाईत पोलीस कर्मचारी राजेंद्र सिनकर, राजेंद्र जोशी, चांगदेव बागुल आदींचा सहभाग होता.

**नागरिकांना एसीबीचे आवाहन**

लाचलुचपत प्रतिबंध विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त लाचेची मागणी करत असल्यास तात्काळ एसीबीशी संपर्क साधावा.

**तक्रारीसाठी संपर्क :**
**टोल फ्री क्रमांक १०६४**
**व्हॉट्सॲप हेल्पलाईन ७७२०८९१०६४**

### प्रा.अरुण पडघन...

संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.किरणराव सुभेदार, कोषाध्यक्ष डॉ. अभयराव सुभेदार, सचिव विजयराव जामकर, सहसचिव डॉ. संजयराव टाकळकर , संचालक सौ.दिपलक्ष्मीताई जामकर, ॲड. बाळासाहेब जामकर, ॲड. मंगेशराव सुभेदार, सौ. कविताताई सुभेदार, गोविंदराव नांदापूरकर, संग्रामभैय्या जामकर, ॲड.पुरुषोत्तम पाटील, प्रो.डॉ.सुवर्णा पाटील, प्राचार्य डॉ.वसंतराव भोसले, प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर, प्रा.डॉ. शिवानंद भानूसे, इंजि.अरुण मराठे,प्राचार्य डॉ. विनायक क्षिरसागर , प्राचार्य डॉ.के.के.पाटील ,प्रा.डॉ. देविदास भागवत , प्रा.डॉ.मल्हारीकांत सोंडगे, प्रा.डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण , प्रा.डॉ सचिन खडके, अजमत खान, विद्यापीठ प्रशासनातील प्रकाश चित्ते, लक्ष्मण जाधव ,त्र्यंबक आव्हाड,सादीक पठाण, शेख.शहाबुद्दीन,दिलीप पडघन, गोविंद पवार यांचे सह महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक , कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.या कामी प्रा.विरराजे म्हसलकर,प्रा.डॉ.विश्वनाथ शेळके, डॉ.मारोती कोल्हे, प्रा.डॉ.दिनेश धनेश्वर ,गणेश कुटे, गणेश खरात, चैतन्य पडघन, सौ.रंगोली व अभिलाषजी सोनूने, सौ.अंजलीताई व विष्णुजी सोनूने,सौ.चारुशीला पडघन,पडघन परिवार,मित्र मंडळ आदींचे सहकार्य लाभले .सर्वच स्तरातून प्रा.डॉ.अरुण पडघन यांचे अभिनंदन होत आहे.

### पत्नीचा रुमालाने....

तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा, साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय अहवाल आणि इतर पुरावे गोळा करण्यात आले.

सरकार पक्षाने न्यायालयात एकूण आठ साक्षीदार तपासले. यामध्ये फिर्यादी, मयत महिलेचा मुलगा, घटनास्थळ पंच, निवेदन पंच, इतर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी डॉ. शेख तसेच तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक मिथुन बी. घुगे यांच्या साक्षी महत्वपूर्ण ठरल्या.

**न्यायालयाचा महत्वपूर्ण निर्णय**

सरकार पक्षाने सादर केलेले साक्षीपुरावे, वैद्यकीय अहवाल आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद विचारात घेत न्यायालयाने आरोपी दोषी असल्याचे स्पष्ट केले. त्यानुसार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा मोहिते यांनी आरोपीस भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५ (-) अंतर्गत १० वर्षांची सश्रम कारावासाची शक्षिा सुनावली.

तसेच १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून दंड न भरल्यास अतिरिक्त दोन वर्षांची सश्रम कारावासाची शक्षिा भोगावी लागणार असल्याचे न्यायालयाने आदेशात नमूद केले.

**सरकारी पक्षाची प्रभावी बाजू**

या खटल्यात अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. डॉ. दिपक नारायणराव कोल्हे यांनी सरकार पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडली. तसेच सेशन कोर्ट पैरवी पोलीस अमलदार व जिल्हा सरकारी वकील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनीही खटल्याच्या कामकाजात सहकार्य केले.

### सदर बाजार पोलिसांनी...

कायद्यातील कलम १२ अ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांचे विशेष पथक सक्रिय या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधु, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या कारवाईत पोलीस निरीक्षक संदीप भारती, डीबी पथक प्रमुख सचिन सानप यांच्यासह पोहेकॉ रंगे, पोलीस कॉन्स्टेबल लोंढे, राहुल कटकम आणि अजीम शेख यांनी सहभाग घेतला.

ऑनलाईन सट्ट्याविरोधात पोलिसांची मोहीम

आयपीएल स्पर्धेदरम्यान ऑनलाईन सट्टा आणि जुगाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने जालना पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली आहे. शहरात विविध ठिकाणी गुप्त माहितीच्या आधारे कारवाया करण्यात येत असून बेकायदेशीर सट्टा व्यवसाय करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

### स्थानिक गुन्हे...

टोळीचा शोध घेत होते. त्यावेळी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, काही दिवसांपूर्वी रंगनाथनगर परिसरात घरफोडी करणारे आरोपी वलीमामू दर्गा परिसरात फिरत आहेत.

माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ सापळा रचून संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी रंगनाथनगर येथील घरफोडीची कबुली दिली. पुढील तपासात त्यांनी जालन्यातील आणखी पाच घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली दिल्याने पोलिसांना मोठे यश मिळाले.

**सहा गुन्ह्यांची कबुली**

पोलिस तपासात आरोपींनी खालीलप्रमाणे सहा गुन्ह्यांची कबुली दिली आहे :

- तालुका पोलीस ठाणे हद्दीतील रंगनाथनगर येथील घरफोडीत २५ हजार रुपये रोख चोरी
- सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीतील व्यंकटेशनगर येथून ५४ हजार रुपये रोख व मोबाईल चोरी
- बालाजीनगर परिसरातून १५ हजार रुपये रोख रक्कम चोरी
- श्रीकृष्णनगर येथून २५ हजार रुपये रोख रक्कम लंपास
- भोकरदन नाका परिसरातील धनलक्ष्मी बिकानेर स्वीट येथे चोरी
- जिजामाता कॉलनी परिसरातील घरफोडी प्रकरण

या सर्व गुन्ह्यांमधील चोरीचा मुद्देमाल पोलिसांनी आरोपींकडून जप्त केला आहे.

**तीन आरोपी पोलिसांच्या ताब्यात**

या प्रकरणात पोलिसांनी सुंदरसिंग सुखुसिंग राजपूत (वय ३४, रा. वलीमामू दर्गा, जालना), लाजरस शांतीलाल मिसाळ (वय १९, रा. वलीमामू दर्गा, जालना) आणि चोरीचा माल खरेदी करणारा मनोज कलाजी धानुरे (वय ३०, रा. दर्गाविस काद्राबाद, जालना) यांना अटक केली आहे.

पोलिसांनी आरोपींकडून रोख रक्कम, मोबाईल आणि इतर साहित्य असा एकूण १ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींकडून आणखी काही गुन्हे उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ यांच्यासह पोलीस अंमलदार रमेश राठोड, गोपाल गोशिक, प्रभाकर वाघ, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, सतीश श्रीवास आणि कैलास चेके यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.

**घरफोडी टोळीवर पोलिसांचा वचक**

स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे घरफोडी करणाऱ्या टोळ्यांमध्ये मोठी भीती निर्माण झाली असून जिल्ह्यातील गुन्हेगारीवर आळा बसण्यास मदत होणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

### जालन्यात अवैध...

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात विशेष बंदोबस्त आणि देखरेख ठेवण्यात आली होती. त्याचदरम्यान गुरुवारी सकाळी एका गुप्त खबऱ्यामार्फत माहिती देण्यात आली की, सकाळी १० वाजल्यापासून संबंधित ठिकाणी मोठ्या प्रमाणात गोवंशांची कत्तल सुरू आहे.

माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ हालचाली सुरू केल्या. बाळासाहेब पवार यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाड टाकली. पोलिसांनी परिसराला वेढा घालत छापा मारताच घटनास्थळी धक्कादायक वास्तव समोर आले.

**११ गोवंशांची कत्तल, १३ जनावरांची सुटका**

छाप्यादरम्यान पोलिसांना मोठ्या प्रमाणात गोवंश मांस आढळून आले. तपासात तब्बल ११ गोवंशांची कत्तल करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. याशिवाय इतर अनेक जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवण्यात आल्याचेही निदर्शनास आले.

पोलिसांनी तात्काळ कारवाई करत १३ जिवंत गोवंशांची सुटका केली. या जनावरांची अंदाजे किंमत ४.५० लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. तसेच घटनास्थळावरून सुमारे ७ लाख रुपयांचे गोवंश मांस जप्त करण्यात आले.

**आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल**

या प्रकरणात शेख मुस्ताक नूर मोहम्मद, रा. नॅशनल नगर, जालना हा व्यक्ती अवैध कत्तलखाना चालवत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. पोलिसांनी आरोपीविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून पुढील तपास सुरू आहे.

या कारवाईत पोलिसांनी एकूण साडेअकरा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये गोवंश मांस, जिवंत जनावरे तसेच इतर साहित्याचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.

**नागरिकांमध्ये संतापाची भावना**

शासनाने गोवंश कत्तलीवर स्पष्ट बंदी घातलेली असताना आणि बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने विशेष दक्षता घेतलेली असताना अशा प्रकारे अवैध कत्तल सुरू असल्याचे समोर आल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. सामाजिक संघटनांनीही या घटनेचा निषेध नोंदवत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

**पोलिसांच्या कारवाईचे सर्वत्र कौतुक**

पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या कठोर भूमिकेमुळे आणि चंदनझीरा पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे सर्व स्तरातून पोलिसांचे कौतुक होत आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी पुढील काळातही अशाच कठोर कारवाया सुरू राहणार असल्याचे संकेत पोलिसांकडून देण्यात आले आहेत.

### मनपा शाळांतील...

विशेष भर देण्यात आला. काही शाळांमध्ये तातडीने दुरुस्तीची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले असून संबंधित कामे १५ जूनपूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**स्टेशनरी साहित्य आणि दुरुस्ती कामांवर भर**

नवीन शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना आवश्यक स्टेशनरी साहित्य, वर्गखोल्यांमधील मूलभूत सुविधा आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध व्हावे, यासाठी शिक्षण विभागाने नियोजन करण्याचे निर्देश दिले.

तसेच प्रत्येक शाळेतील प्रलंबित कामांची माहिती तातडीने अद्ययावत करून ती गुगल शीटच्या माध्यमातून शिक्षण विभागाकडे सादर करण्याच्या सूचनाही सर्व मुख्याध्यापकांना देण्यात आल्या. यामुळे प्रत्येक कामाचा नियमित पाठपुरावा करणे आणि वेळेत अंमलबजावणी सुनिश्चित करणे शक्य होणार असल्याचे सांगण्यात आले.

**शिक्षणाच्या गुणवत्तेसोबत सुविधांनाही प्राधान्य**

बैठकीत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच शाळांमधील भौतिक सुविधा मजबूत करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील सहभाग आणि उपस्थितीत वाढ होण्यास मदत होईल, असेही यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी शिक्षण विभागाच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती सुप्रिया चव्हाण, प्रभारी शिक्षणाधिकारी, सर्व मुख्याध्यापक तसेच शिक्षण विभागातील कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत विविध सूचना आणि उपाययोजनांवर सकारात्मक चर्चा झाली.

## पावसाळ्यापूर्वी जालना शहरातील मोठ्या नाल्यांची स्वच्छता वेगात

# ५० टक्के काम पूर्ण; उर्वरित कामे १५ दिवसांत पूर्ण करण्याचे आयुक्त अंजली शर्मा यांचे आदेश

**जालना । प्रतिनिधी**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जालना शहर महानगरपालिकेकडून शहरातील मोठ्या नाल्यांच्या साफसफाईची मोहीम युद्धपातळीवर सुरू करण्यात आली असून आतापर्यंत सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे. शहरात पावसाचे पाणी साचू नये, पूरस्थिती निर्माण होऊ नये तसेच नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी नाला स्वच्छता मोहिमेला गती देण्यात आली आहे.

जालना शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व प्रभारी स्वच्छता निरीक्षक आणि मुकादम यांनी सादर केलेल्या अहवालानुसार शहरातील विविध भागांतील मोठ्या नाल्यांमधून गाळ, प्लास्टिक, कचरा आणि इतर अडथळे काढण्याचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. या कामाचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महानगरपालिका आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांनी आज, दि. २७ मे २०२६ रोजी विविध नाल्यांच्या ठिकाणी भेट दिली.

**१५ दिवसांत काम पूर्ण करण्याच्या सूचना**

नाला साफसफाईच्या कामाची पाहणी करताना आयुक्त अंजली शर्मा यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व मोठ्या नाल्यांमधील गाळ आणि कचरा पूर्णपणे हटविण्याचे आदेश दिले. उर्वरित सर्व कामे येत्या १५ दिवसांत पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. यावेळी त्यांनी कामाच्या गुणवत्तेबाबतही सूचना करत, केवळ वरवरची साफसफाई न करता नाल्यांमधील अडथळे पूर्णपणे दूर करण्यावर भर दिला. पावसाळ्यात शहरातील सखल भागांमध्ये पाणी साचण्याच्या समस्या टाळण्यासाठी प्रशासनाने विशेष नियोजन केले असल्याचे त्यांनी सांगितले.

**अधिकाऱ्यांची उपस्थिती**

या पाहणी दौऱ्यावेळी उपायुक्त त्र्यंबक कांबळे, सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर, शहर अभियंता सय्यद सऊद तसेच स्वच्छता विभाग प्रमुख सुधीर डहाळे उपस्थित होते. संबंधित अधिकाऱ्यांनी विविध भागांमध्ये सुरू असलेल्या कामांची माहिती आयुक्तांना दिली.

**अतिक्रमण हटविण्याचे आवाहन**

महानगरपालिका प्रशासनाने शहरातील नागरिकांना नाल्यांवरील अतिक्रमणे स्वखुशीने काढून घेण्याचे आवाहन केले आहे. अनेक ठिकाणी नाल्यांवर झालेल्या अतिक्रमणामुळे पाण्याचा प्रवाह अडतो आणि पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढतो, असे प्रशासनाने स्पष्ट केले. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन महापौर , उपमहापौर , सभापती तसेच आयुक्त यांनी केले आहे.

**पावसाळ्यापूर्वी प्रशासनाची धावपळ**

दरवर्षी पावसाळ्यात शहरातील काही भागांमध्ये पाणी साचण्याच्या समस्या निर्माण होत असल्याने यंदा प्रशासनाने आधीच खबरदारी घेत नाला स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. यामुळे शहरातील पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यास मदत होणार असून नागरिकांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

---

# चायनिज पदार्थ आरोग्यासाठी हानिकारकच

भारतीयांना चायनीज गोष्टीचे पूर्वीपासूनच आकर्षण आहे. अगदी चिनी वस्तूंपासून चायनिज पदार्थांपर्यंत सर्वच गोष्टी भारतीयांना आवडतात. त्यातही चायनिज पदार्थांची तर सर्वांना चटक लागलेली आहे. बाहेर जेवायला जायचे म्हटले तर बरेच जण चायनिज पदार्थांचाच बेत करतात. मात्र भारतात आणि चीनमध्ये मिळणाऱ्या पदार्थात खूप फरक आहे. भारतात चायनिज पदार्थांच्या नावाखाली जिभेला पूरक ठरतील असे चवीचे पदार्थ तयार केले जातात. रस्त्याशेजारी, फुटपाथवर, गल्लीबोळात स्वस्त आणि सहज मिळणारे गडावरील चायनिज पदार्थ खाण्याकडे सर्वांचा कल असते त्यातही या गाड्यांवर तरुणाईच अधिक दिसते. चायनिज गाड्यांवर तरुणाईची झुंबड उडाल्याचे दिसते. ग्रुपमधील कोणा मित्राचा वाढदिवस असेल तर तो साजरा करण्यासाठी तरुणाई चायनिज गाड्यावरच जातात. हॉटेल आणि रेस्टॉरंटच्या तुलनेत येथे स्वस्तात पदार्थ मिळतात हे त्या मागचे मुख्य कारण आहे. मात्र हे पदार्थ स्वस्तात देण्यासाठी तेथील आचारयाना अनेक तडजोडी कराव्या लागतात. त्यात निकृष्ट प्रकारच्या पदार्थांच्या भाज्या आणि तेल वापरले जाते. चायनिज पदार्थांमध्ये अजिनिमोटो हा पदार्थ वापरला जातो. पदार्थांना चव आणण्यासाठी या पदार्थांचा वापर केला जातो. आवश्यकतेपेक्षा जास्त अजिनिमोटो हा पदार्थ वापरला गेला तर त्याचा परिणाम पचनसंस्थेवर होऊ शकतो. चायनिज पदार्थांमध्ये मोनोसोडियम ग्लुटामेट, शेजवान सॉस, कृत्रिम रंग, स्टार्च कॉर्न यासारखे जिन्नस वापरल्यामुळे पचन संस्था बिघडू शकते. भात बांबूचे मूळ, मशरूम, नूडल्स, चिकन, मांस अर्धवट शिजवले जातात त्यामुळे ते पचायला जड जातात चांगल्या प्रतीचा मैदा नसल्यास तो आतड्यास चिकटू शकतो. चायनिज पदार्थांमध्ये वापरला जाणारा तांदूळही पॉलिश आणि रिफाईंड असल्याने पचन संस्थेसाठी हितकारक नसतो. त्यामुळे चायनिज पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी हानिकारकच आहे. एखाद्यावेळी चायनिज पदार्थ खाल्ल्याने ते ही चांगल्या हॉटेल किंवा रेस्टॉरंट मध्ये जाऊन तर बिघडत नाही. पण आठवड्यातून चार पाच वेळा चायनिज पदार्थ खाण्याची सवय हानिकारक ठरू शकते.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

---

# रमाई आंबेडकर स्मृतीदिनानिमित्ताने विनम्र अभिवादन



**दत्ता देशमुख**

समर्थ नगर जालना येथील तक्षशिला बहुद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे माता रमाई आंबेडकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला बौद्ध उपासक आणि उपासिका उपस्थीत होत्या.यावेळी पडघन सिस्टर यांनी माता रमाई बदल यांच्या कार्याचा गौरव केला आणि अभिवादन केले.महेंद्र साळवे यांनी रमाई यांच्यावर कविता सादर केली.यानंतर मालती गायकवाड आणि कांबळे मॅडम यांनी पण आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर काही लोकांनी गाणी गायली, कविता म्हटली.या कार्यक्रमाला तक्षशीला बौधविहार चे अध्यक्ष भिकाजी साळवे उपस्थित होते. याशिवाय या कार्यक्रमास चंद्रकांत वाघमारे,अशोक गंगावणे,सुदाम कांबळे,मीनाताई शरणागत,निर्मला बडोले,ज्योती मगरे,सोनल साळवे,उघडे ताई आणि इतर बौद्ध उपासक उपस्थित होते.

---

## सहा महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या अपहरण प्रकरणाचा उलगडा ; आरोपी व अल्पवयीन मुलीचा शोध

**जालना । प्रतिनिधी**

सुमारे सहा महिन्यांपासून तपासावर प्रलंबित असलेल्या अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याच्या गंभीर प्रकरणाचा अखेर जालना पोलिसांच्या अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिटने (AHTU) उलगडा केला आहे. गुप्त माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याच्या जोरावर आरोपी युवकासह पीडित अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले आहे.

या कारवाईमुळे दीर्घकाळापासून चिंतेत असलेल्या पीडित कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून जालना पोलिसांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा आरोप**

मिळालेल्या माहितीनुसार, सारंगपूर ता. अंबड जि. जालना येथील फिर्यादी यांची १७ वर्षे ६ महिने वयाची अल्पवयीन मुलगी १७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास घरातून निघून गेली होती. त्यानंतर तिचा शोध घेतला असता ती आढळून आली नाही.

या प्रकरणात सारंगपूर येथील शुभम सखाराम काकडे (वय २१ वर्ष) याने संबंधित मुलीला लग्नाचे आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची तक्रार अंबड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. त्यानुसार आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला.

**सहा महिने आरोपीचा ठावठिकाणा नव्हता**

गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक पोलिसांकडून आरोपी व मुलीचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र, बराच कालावधी उलटूनही आरोपी आणि पीडित मुलगी यांचा ठावठिकाणा लागत नव्हता. त्यामुळे प्रकरण अधिक गंभीर बनले होते. यानंतर मा. पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या आदेशानुसार १ एप्रिल २०२६ रोजी या प्रकरणाचा पुढील तपास अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिट ₹
( AHTU), जालना यांच्याकडे वर्ग करण्यात आला.

**तांत्रिक विश्लेषणातून आरोपीपर्यंत पोहोचले पोलिस**

प्रकरण हाती घेतल्यानंतर पथकाने आरोपीविषयी गोपनीय माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. मोबाईल लोकेशन, तांत्रिक विश्लेषण आणि इतर माहितीच्या आधारे आरोपीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले.

दरम्यान, आरोपी शुभम काकडे हा अंबड परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संबंधित ठिकाणी धाड टाकली आणि आरोपीस ताब्यात घेतले. त्याचवेळी पीडित अल्पवयीन मुलीचाही शोध घेण्यात पोलिसांना यश आले.

यानंतर आरोपी आणि मुलीला पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी अंबड पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई**

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी आणि पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या मोहिमेत अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिटचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, सपोउपनि रविंद्र चव्हाण, ग्रेड पोउपनि जोशी, महिला अंमलदार संगीता चव्हाण आणि चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांनी विशेष मेहनत घेतली.

**पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक**

सहा महिन्यांपासून रखडलेल्या प्रकरणाचा उलगडा करून आरोपीला ताब्यात घेण्यात आल्याने नागरिकांकडून पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले जात आहे.

---

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर जालना मनपाची विशेष तयारी ; मटण वेस्टेज संकलनासाठी दोन विशेष घंटागाड्यांचे लोकार्पण

### जुना व नवीन जालन्यासाठी धावणार पिवळ्या रंगाच्या विशेष घंटागाड्या ; स्वच्छता आणि आरोग्य सुरक्षेसाठी मनपाचा पुढाकार

**जालना । प्रतिनिधी**

बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरात स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्य अबाधित राखण्यासाठी जालना शहर महानगरपालिका प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सणादरम्यान मोठ्या प्रमाणात निर्माण होणारा मटण व चिकनचा जैविक कचरा (वेस्टेज मटेरियल) उघड्यावर फेकला जाण्याचे प्रकार रोखण्यासाठी महानगरपालिकेने विशेष पिवळ्या रंगाच्या दोन घंटागाड्या सेवेत दाखल केल्या आहेत. या विशेष घंटागाड्यांचा लोकार्पण सोहळा गुरुवारी (दि. २८ मे २०२६) मोतीबाग ईदगा परिसरात मोठ्या उत्साहात पार पडला. जालना महानगरपालिका आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.



**स्वच्छता राखण्यासाठी मनपाची विशेष मोहीम**

दरवर्षी बकरी ईदच्या काळात शहरात मोठ्या प्रमाणावर मटण व चिकन वेस्टेज तयार होत असते. अनेक ठिकाणी हा कचरा उघड्यावर, रस्त्यांच्या कडेला किंवा नाले-गटारांमध्ये टाकला जात असल्याने दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. तसेच या कचऱ्यामुळे भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट वाढून नागरिकांना त्रास सहन करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर जालना महानगरपालिकेने विशेष नियोजन करत जुना जालना आणि नवीन जालना परिसरासाठी स्वतंत्र अशा दोन विशेष घंटागाड्या उपलब्ध करून दिल्या आहेत. या घंटागाड्या शहरातील विविध भागात फिरून मटण व चिकन वेस्टेज संकलित करणार आहेत.

**उघड्यावर कचरा टाकल्यास कारवाईचा इशारा**

महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, बकरी ईदच्या निमित्ताने निर्माण होणारे मटण वेस्टेज उघड्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी टाकू नये. तसेच नाले, गटारे किंवा रस्त्यावर मांसाचे अवशेष फेकल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

उघड्यावर चिकन-मटण विक्रीस प्रतिबंध करणारे अधिकारी मोहम्मद अमजद खान यांच्या पथकाद्वारे शहरात विशेष लक्ष ठेवले जाणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाणार आहे.

**नागरिकांना सहकार्याचे आवाहन**

महानगरपालिका आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांनी शहरातील नागरिकांना आणि मुस्लिम बांधवांना स्वच्छतेच्या उपक्रमात सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, ''बकरी ईदच्या काळात निर्माण होणारे मटण वेस्टेज मजबूत प्लास्टिक पिशवीत व्यवस्थित पॅक करूनच विशेष घंटागाडीत जमा करावे. यामुळे दुर्गंधी रोखण्यास मदत होईल आणि शहरात रोगराई पसरणार नाही.''

त्याचबरोबर शहर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**अनेक मान्यवरांची उपस्थिती**

या लोकार्पण कार्यक्रमाला महानगरपालिका आयुक्त श्रीमती अंजली शर्मा, सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर, मोहम्मद अमजद खान, मोतीबाग ईदगाचे मुतवली शहा आलम खान, सय्यद रियाज, भरत गायकवाड, फिरोज अली, अलीम कुरेशी, सय्यद रिजवान यांच्यासह स्वच्छता विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आरोग्यदायी आणि स्वच्छ शहरासाठी पुढाकार**

महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे बकरी ईदच्या काळात शहरातील स्वच्छता राखण्यास मोठी मदत होणार असून सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. नागरिकांनीही प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

---

# जाफ्राबादमध्ये थरारक घटना : मिरची व्यापारी शेख मोहसीन यांची निर्घृण हत्या

## बुलेट चोरी करणाऱ्या चोरट्यांचा पाठलाग जीवावर बेतला; पुतण्या गंभीर जखमी, तालुक्यात भीतीचे वातावरण

**जाफ्राबाद । दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील चिखली रोडवरील जंजाळवाडी परिसरात मंगळवारी मध्यरात्री घडलेल्या थरारक आणि रक्तरंजित घटनेने संपूर्ण तालुका हादरून गेला आहे. बुलेट चोरी करून पळून जाणाऱ्या चोरट्यांचा पाठलाग करणाऱ्या मिरची व्यापारी शेख मोहसीन शेख मजीद (वय ४६) यांच्यावर अज्ञात आरोपींनी धारदार शस्त्रांनी सपासप वार करत निर्घृण हत्या केली. या हल्ल्यात त्यांचा पुतण्या शेख साहिल हाही गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या घटनेमुळे जाफ्राबाद शहरासह परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना अधिक तीव्र झाली आहे.

**मध्यरात्री घडली रक्तरंजित घटना**

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि. २७ मे) मध्यरात्री अंदाजे १ ते २ वाजेच्या सुमारास जंजाळवाडी परिसरातून बुलेट मोटारसायकल चोरी करून काही चोरटे पसार होत होते. याची माहिती मिळताच मिरची व्यापारी शेख मोहसीन यांनी आपल्या पुतण्यासह आरोपींचा पाठलाग सुरू केला.

चिखली रोडलगत आरोपींना अडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, पकडले जाण्याची भीती निर्माण होताच चोरट्यांनी अचानक धारदार शस्त्रे बाहेर काढून शेख मोहसीन यांच्यावर जीवघेणा हल्ला चढवला. आरोपींनी अत्यंत निर्दयीपणे डोके, मान, पाठ आणि दंडावर वार केले. तब्बल सात वार झाल्याने मोहसीन गंभीर रक्तबंबाळ अवस्थेत कोसळले. हल्ला इतका भीषण होता की परिसरात एकच खळबळ उडाली. त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करणाऱ्या पुतण्या शेख साहिल याच्यावरही आरोपींनी हल्ला केला. त्यामुळे तोदेखील गंभीर जखमी झाला.

**उपचारासाठी नेत असताना मृत्यू**

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने जखमींना उपचारासाठी हलविले. शेख मोहसीन यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जालना येथे नेत असताना वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची बातमी समजताच जाफ्राबाद शहरात शोककळा पसरली.

दुसरीकडे, शेख साहिल याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे.

**आरोपी फरार; पोलिसांची विशेष पथके रवाना**

घटनेनंतर आरोपींनी अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पलायन केले. माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि अन्य तांत्रिक बाबींच्या आधारे तपास सुरू करण्यात आला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली असून लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

**व्यापारी व सामाजिक क्षेत्रातून हळहळ**

मयत शेख मोहसीन हे जाफ्राबादमधील परिचित मिरची व्यापारी होते. तसेच ते न्यू हायस्कूलचे शिक्षक शेख मोबिन सर यांचे लहान बंधू होते. त्यांच्या अकाली आणि दुर्दैवी निधनामुळे तालुक्यात शोककळा पसरली असून व्यापारी, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेनंतर अनेकांनी रुग्णालय व त्यांच्या निवासस्थानी धाव घेत कुटुंबीयांचे सांत्वन केले. शहरातील विविध संघटनांनी आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

**वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये संताप**

जाफ्राबाद तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून चोरी, मारहाण आणि गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. भररात्री झालेल्या या निर्घृण हत्येमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# कडवंची येथे जिल्हाधिकाऱ्यांचा मुक्कामी दौरा

**जालना | प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दि. २७ मे रोजी जालना तालुक्यातील कडवंची गावात मुक्कामी दौरा करून ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. ग्रामीण भागातील प्रशासनाची कामकाज पद्धती, विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी तसेच गावाच्या विकासाचा प्रत्यक्ष आढावा घेत त्यांनी लोकाभिमुख प्रशासनाचा अनुभव गावकऱ्यांना दिला. जिल्हाधिकारी या रात्री सुमारे दहा वाजता कडवंची गावात दाखल झाल्या. यावेळी प्रगतशील शेतकरी कृष्णा क्षिरसागर यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांनी गावातील शेतकऱ्यांशी संवाद साधत कडवंची गावाचा द्राक्ष शेतीमुळे झालेला विकास, शेतकऱ्यांची प्रगती आणि यशोगाथा जाणून घेतली. द्राक्ष पिकाच्या माध्यमातून गावाने आर्थिकदृष्ट्या केलेली



भरारी ऐकून त्यांनी समाधान व्यक्त केले. पुढील काळात अधिक प्रगती साधण्यासाठी द्राक्ष पिकावर आधारित प्रक्रिया उद्योग, पूरक व्यवसाय आणि मूल्यवर्धित उपक्रम सुरू करण्याबाबतही त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

पहाटे सहा वाजता उठून जिल्हाधिकारी यांनी ग्रामीण भागातील पहाटेची दिनचर्या अनुभवली. गावातील कृषी सेवा केंद्राला भेट देऊन विविध फवारणी औषधे, खते आणि कृषी साहित्याची माहिती घेतली. शेतकऱ्यांना योग्य दरात व गुणवत्तापूर्ण साहित्य उपलब्ध होते का, याचीही त्यांनी चौकशी केली.

त्यानंतर त्यांनी महा-ई-सेवा केंद्राला भेट देऊन नागरिकांना विविध दाखले व प्रमाणपत्रे वेळेत आणि रास्त दरात मिळतात का, याची माहिती ग्रामस्थांकडून घेतली. स्वस्त धान्य दुकानात जाऊन लाभार्थ्यांना नियमित व पुरेसे धान्य मिळते का, याची खातरजमा सामान्य नागरिकांशी थेट संवाद साधून केली.

ग्रामपंचायत कार्यालयाच्या भेटीदरम्यान त्यांनी ग्रामपंचायतीच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. गावाने उत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. तसेच अंगणवाडी केंद्राला भेट देऊन तेथील शिजवलेल्या अन्नाची प्रत्यक्ष चव घेऊन गुणवत्ता तपासली. खिचडीची गुणवत्ता समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले. सध्या गावात सुरू असलेल्या जनगणनेच्या कामाचाही त्यांनी आढावा घेतला. प्रगणकांसोबत घरगणनेच्या प्रक्रियेची तपासणी करून कामकाजाबाबत सूचना दिल्या. यावेळी उपविभागीय अधिकारी श्री. दौंड, तहसीलदार छाया पवार आदींची उपस्थिती होती.

# आ.अर्जुनराव खोतकर यांनी विज कंपनीच्या अधिकाऱ्यांना घेतले फैलावर

**जालना - प्रतिनिधी**

पावसाच्या थोड्या सरी आल्या किंवा वारा आला तर लगेच वीज गायब होण्याचे प्रकार वाढल्याने जालनेकर नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार अर्जुनराव खोतकर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अक्षरशा फैलावर घेतले. यापुढे वीज गायब होणार नसल्याचा सर्वांनी शब्द दिल्यामुळे विजेच्या त्रासातून जालनेकरांची सुटका होणार आहे. मागील काही दिवसांपासून जालना शहर आणि ग्रामीण भागात वीज गायब होण्याचे प्रकार वाढलेले आहेत. थोडा वारा आला, आभाळ आले किंवा गडगडाट झाला तरी वीज बंद केली जात होती. तीव्र उन्हामुळे जालनेकर नागरिकांची उकाड्यामुळे तगमग वाढली होती. वीज गायब होताच घरात उकाडा होत असल्याने लहान बाळांना घेऊन महिला रस्त्यावर येत होत्या. वयोवृद्ध व्यक्तींची दमछाक होत होती. दोन दोन तीन तीन तास वीज गायब असल्याने नागरिक अक्षरशः हैराण झाले होते. या पार्श्वभूमीवर आमदार अर्जुनराव खोतकर यांनी तातडीने अधीक्षक अभियंता श्री. सरग यांच्या उपस्थितीत वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कन्हैयानगर येथील कार्यालयात बैठक बोलावली. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, लाईट गेल्यावर लोक तुम्हाला जसे बोलतात तसेच मलाही लोकांचे फोन येतात. तुम्ही लोकांना फुकट विज देत नाहीत. लोकांना पैसे मोजावे लागतात. लोकांच्या रोशाला तुम्हाला जसे सामोरे जावे लागते त्यापेक्षा जास्त मला सामोरे जावे लागते. त्यामुळे यापुढे वीज गायब होणार नाही याची तुम्हाला काळजी घ्यावी लागणार आहे. तुमच्या अडचणी असतील तर मला सांगा. मी त्या दूर करतो. परंतु लोकांना त्रास व्हायला नको. महानगरपालिका झाडे तोडू देत नाहीत त्यामुळे झाडाच्या फांद्याला अडकून फ्युज उडतात असे सांगण्यात आले. याबाबत लगेच महानगरपालिकेला सांगून झाड तोडण्यापेक्षा फांद्या तोडून विजेच्या तारांचा अडथळा दूर करण्यासाठी सहकार्य करा असे सुचविले. यावेळी अधीक्षक अभियंता श्री. सरग यांनीही वीज गायब होत असल्याची कबुली देऊन यापुढे असे प्रकार होणार नाहीत असा सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांच्या वतीने शब्द दिला. आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, मागील वर्षी सुद्धा आपण बैठक घेतली होती.

# जालना वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या अध्यक्षपदी रामेश्वर लहामगे यांची फेरनिवड

## भाग्यनगर येथे पार पडली बैठक; नवीन कार्यकारिणीची घोषणा, विक्रेत्यांच्या प्रश्नांवर एकजुटीचा निर्धार

**जालना | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना सलग्न जालना वृत्तपत्र विक्रेता संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक भाग्यनगर येथील जालना-बदनापूर सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत संघटनेच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून अध्यक्षपदी रामेश्वर लहामगे आणि सचिवपदी संतोष लहाने यांची बिनविरोध फेरनिवड करण्यात आली.

बैठकीत उपस्थित वृत्तपत्र विक्रेत्यांनी नव्या कार्यकारिणीचे स्वागत करत संघटनेच्या माध्यमातून विक्रेत्यांच्या विविध प्रश्नांसाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.



यावेळी संघटनेच्या इतर पदाधिकाऱ्यांचीही निवड करण्यात आली. त्यामध्ये उपाध्यक्षपदी उमेश भदणेकर, कार्याध्यक्षपदी गजानन वीर, कोषाध्यक्षपदी शिवराम भवर, जिल्हा संघटकपदी गणेश वाळेकर, सहसचिवपदी गणेश गव्हाणे यांची निवड करण्यात आली. तसेच संघटनेच्या मार्गदर्शकपदी रामेश्वर सतकर आप्पा, शंकरसिंग ठाकूर आणि विठ्ठलराव शहाणे यांची निवड जाहीर करण्यात आली. या बैठकीस जिल्ह्यातील अनेक वृत्तपत्र विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये विकी वीर, अक्षय पांढरे, किशन ढोलके, गोपीचंद सलामबाद, संजय लहाने, मनोज गरदास, गणेश चिंके, योगेश एकशिंगे, अर्जुन डोळेझाके आदींचा सहभाग होता. बैठकीदरम्यान वृत्तपत्र वितरण व्यवसायासमोरील अडचणी, वाढती स्पर्धा, बदलते माध्यमांचे स्वरूप तसेच विक्रेत्यांच्या हक्कांसाठी संघटनेची भूमिका यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# मालवाहतुकीतील हलगर्जीपणा भोवला; बियाणे कंपनीला ३ लाखांची नुकसान भरपाई देण्याचे ग्राहक मंचाचे आदेश

**जालना | प्रतिनिधी**

शहरातील एका वाहतूक कंपनीला मालाची सुरक्षित वाहतूक न करणे चांगलेच महागात पडले आहे. वाहतुकीदरम्यान झालेल्या अपघातात मालाचे नुकसान झाल्याने जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने संबंधित वाहतूक कंपनीला दणका दिला आहे. तक्रारदार बियाणे कंपनीला मालाची किंमत आणि नुकसान भरपाई म्हणून एकूण ३,००,१७० रुपये देण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत. या निकालामुळे सेवा पुरवठादारांच्या मनमानी कारभाराला चाप बसला आहे.

या प्रकरणी अधिक माहिती अशी की, गांधीनगर, गुजरात येथील वेस्टर्न ऍग्री सीड्स लिमिटेड या कंपनीने जालन्यातील पंजाब महाराष्ट्र रोडलाइन्स या वाहतूक कंपनीमार्फत ३७०० किलो बियाणे (१७९ बॅग) गांधीनगर येथे पाठवण्यासाठी बुक केले होते. या मालाची एकूण किंमत ७,२२,०५२ रुपये होती. वाहतूक कंपनीने २७ एप्रिल २०२३ रोजी मालाची पावती देऊन तो स्वीकारला. मात्र, निर्धारित ठिकाणी केवळ ८१ बॅग बियाणे पोहोचले आणि तब्बल ९८ बॅग, ज्यांची किंमत २,९०,१७० रुपये होती, त्या गहाळ झाल्या. याबाबत चौकशी केली असता, माल घेऊन जाणाऱ्या वाहनाला कन्नडजवळ अपघात झाल्याचे आणि काही बियाण्यांच्या बॅग दरीत पडून नुकसान झाल्याचे समोर आले. वाहतूक कंपनीच्या या हलगर्जीपणामुळे आणि सेवा त्रुटीमुळे बियाणे कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान झाले. कंपनीने वाहतूकदाराकडे नुकसान भरपाईची मागणी केली, परंतु त्यांनी प्रतिसाद दिला नाही. अखेरीस, बियाणे कंपनीने जिल्हा ग्राहक वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांच्यामार्फत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे धाव घेतली. आयोगाने तक्रार दाखल करून घेतल्यानंतर वाहतूक कंपनीला नोटीस बजावली, परंतु त्यांनी नोटीस स्वीकारण्यास नकार दिला आणि सुनावणीस गैरहजर राहिले. त्यामुळे आयोगाने हे प्रकरण एकतर्फी चालवले. आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती अपर्णा हेमंत काटे ,सदस्य श्री. उदय दत्तू दळवी आणि श्री. संतोष चांगदेव निकुळे यांनी सादर केलेले पुरावे तपासले. वाहतूक कंपनीने सेवेमध्ये गंभीर त्रुटी ठेवल्याचा निष्कर्ष काढत आयोगाने तक्रार अंशतः मंजूर केली. त्यानुसार, पंजाब महाराष्ट्र रोडलाइन्सला गहाळ झालेल्या मालाची किंमत २,९०,१७० रुपये आणि मानसिक त्रासापोटी व तक्रार खर्चापोटी १०,००० रुपये तक्रारदार कंपनीला देण्याचे आदेश दिले. या निकालावर बोलताना जिल्हा ग्राहक वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले की, ''सेवा पुरवठादाराने ग्राहकाकडून पैसे घेतल्यावर सेवा सुरक्षितपणे देणे हे त्याचे कर्तव्य आहे. अपघात हे अनियंत्रित असले तरी, मालाची सुरक्षितता सुनिश्चित करण्याची जबाबदारी वाहतूक कंपनीचीच असते. हा निकाल सर्व वाहतूक कंपन्यांसाठी एक धडा आहे आणि ग्राहकांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्यास प्रोत्साहित करणारा आहे. ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ अंतर्गत ग्राहकांना जलद आणि प्रभावी न्याय मिळतो, हे या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.''

या निकालामुळे वाहतूक आणि कुरिअर सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव होईल आणि त्या ग्राहकांना अधिक चांगली सेवा देतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. ग्राहकांनी कोणत्याही सेवेतील त्रुटींविरोधात आवाज उठवावा, असे आवाहनही ॲड. धन्नावत यांनी केले आहे.

# ईदच्या पार्श्वभूमीवर टेंभुर्णीत पोलिसांचा रूट मार्च

## एकादशी, प्रदोष आणि बकरी ईद एकाच दिवशी; शांतता व सामाजिक ऐक्य राखण्याचे प्रशासनाचे आवाहन

**टेंभुर्णी | दत्ता देशमुख**

बकरी ईद, एकादशी आणि प्रदोष हे धार्मिक सण एकाच दिवशी येत असल्याच्या पार्श्वभूमीवर टेंभुर्णी शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच सर्व धर्मीयांनी सलोखा आणि बंधुभावाने सण साजरे करावेत, या उद्देशाने पोलिस प्रशासनाच्या वतीने शहरातून भव्य रूट मार्च काढण्यात आला.

या रूट मार्चद्वारे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासोबतच कोणत्याही प्रकारची अशांतता निर्माण होऊ नये, यासाठी पोलिस प्रशासन सज्ज असल्याचा संदेश देण्यात आला.



यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती आणि बाबासाहेब खार्डे यांनी नागरिकांना शांतता आणि सामाजिक ऐक्य जपण्याचे आवाहन केले. ''हिंदू आणि मुस्लिम समाजाचे सण योगायोगाने एकाच दिवशी आले आहेत. ही बाब सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचे प्रतीक आहे. सर्वांनी परस्पर सहकार्य, संयम आणि एकोपा राखून सण उत्साहात व शांततेत साजरे करावेत,'' असे त्यांनी सांगितले.

**शहरातील प्रमुख मार्गांवरून रूट मार्च**

टेंभुर्णी पोलीस स्टेशनपासून सुरू झालेला हा रूट मार्च शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आला. मेन रोड, मारवाडी गल्ली, भाजी मंडी, राम मंदिर परिसर, माळी गल्ली, सावता माळी मंगल कार्यालय आदी भागातून मार्च काढत पुन्हा पोलीस स्टेशन येथे समारोप करण्यात आला.

रूट मार्चदरम्यान पोलिसांनी नागरिकांशी संवाद साधत अफवांवर विश्वास ठेवू नये, कोणतीही संशयास्पद घटना आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन केले.

**पोलिस प्रशासन पूर्णपणे सज्ज**

बकरी ईदच्या निमित्ताने शहरात विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला असून संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त पोलीस कर्मचारी नियुक्त करण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. शहरात ठिकठिकाणी गस्त वाढविण्यात आली असून सोशल मीडियावरही पोलिसांचे विशेष लक्ष असल्याचे सांगण्यात आले.

या रूट मार्चमध्ये पोलिस अधिकारी, कर्मचारी तसेच होमगार्ड जवान मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पोलिसांच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत करण्यात आले असून शांतता आणि सलोखा कायम राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली.

**सामाजिक ऐक्याचा संदेश**

टेंभुर्णी शहरात गेल्या अनेक वर्षांपासून विविध धर्मीय नागरिक एकोप्याने सण साजरे करत असल्याची परंपरा आहे. यंदाही बकरी ईद, एकादशी आणि प्रदोष एकाच दिवशी आल्याने धार्मिक सौहार्द आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडत आहे. पोलिस प्रशासनाच्या रूट मार्चमुळे नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून शांततेत सण पार पडतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# माहोरा येथे बकरी ईद उत्साहात साजरी, नमाज अदा करून दिला ऐक्याचा संदेश




**(दत्ता देशमुख )**

माहोरा येथे ईद-उल-अजहा (बकरी ईद) निमित्त मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात नमाज अदा केली. सकाळी मशिदींमध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम समाज बांधव उपस्थित राहून नमाज अदा करण्यात आली. नमाजनंतर एकमेकांना ईदच्या शुभेच्छा देत बंधुभाव आणि ऐक्याचा संदेश देण्यात आला.

यावेळी शांतता व सुव्यवस्था राखण्यात आली ईद-उल-अजहाच्या निमित्ताने समाजात प्रेम, शांतता आणि भाईचाऱ्याचा संदेश देत हा सण उत्साहात साजरा करण्यात आला. बकरी ईद हा इस्लाम धर्मातील दुसरा सर्वात मोठा सण आहे. रमजान ईदनंतर सुमारे ७० दिवसांनी येतो. याला ''ईद-उल-अधा'' म्हणजे ''त्यागाची ईद'' असेही म्हणतात.







जालना शहरातील सदर बाजार ईदगा येथे ईद उल अज्हा नमाज पठण करण्यात आली मोठ्या संख्येने मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते (छाया/जावेद तंबोली)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.